९७१/५

असा. क्र. २९

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८



# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, मे १२, २००८/वैशाख २२, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्ती-वेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | २५८-२५९ |


दिनांक ११ मे २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९७७ चा महा. १.)

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे. (संक्षिप्त नाव व प्रारंभ.)

(२) तो, दिनांक १ मे २००८ पासून अंमलात येईल.



भाग चार--५६

[**किंमत** : १५.०० रुपये]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— १९७७ चा महा. १.

(क) " आठ हजार रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये, " पाचशे रुपये " या मजकुराऐवजी, " सातशे पन्नास रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " १ एप्रिल २००७ " या मजकुराऐवजी, " १ मे २००८ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मधील,—

(एक) " १ एप्रिल २००७ " या मजकुराऐवजी, " १ मे २००८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२ब) मधील, " १ एप्रिल २००७ पासून दरमहा चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " १ मे २००८ पासून दरमहा पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई